पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 30/01/2020 (गुरूवार)
(सायंकाळ)

---

## जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. केळवद :– दिनांक 14/12/2017 चे 16.26 वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. केळवद येथे अप. क्र. 207/2017 कलम 363, 376(2)(आय)(एफ)(जे)भादवी सहकलम 4, 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 14/12/2017 चे 09:00 वा. ते 11:00 वा. सुमारास फिर्यादी यांची 7 वर्षीय मुलगी/पीडिता ही शाळेच्या मैदानावर खेळत असतांना आरोपी नामे– रोशन खेमराज मोहतकर, वय 22 वर्ष, रा. तिडंगी, ता. कळमेश्वर याने तिला चॉकलेटचे आमिष दाखवून तिला मोटरसायकलवर बसवुन शेतातील झापडीत नेवून बळजबरीने पीडितेसोबत जबरी संभोग केला.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक श्री. अनिल देरकर, पो.स्टे. केळवद यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक 30/01/2020 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्रीमन. के. जी. राठी, न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला 1) कलम 376 (2)(आय) भादंवि. सहकलम 5(एम) 6 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये 10 वर्ष सश्रम कारावास व 1,000/–रू. दंड व दंड न भरल्यास 2 महीनेची कैद शिक्षा, 2) कलम 363 भादंवि मध्ये 3 वर्ष सश्रम कारावास व 5,00/–रू. दंड व दंड न भरल्यास 1 महीना साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. माधुरी मोटघरे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सहायक पोलिस निरीक्षक श्री. संजय खोकले तर कर्मचारी सहा.फौज. श्री. भवानीप्रसाद मिश्रा, अरूण भुरे, पोना शेखर मेश्राम, रविन्द्र डारले यांनी मदत केली आहे.

# अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. केळवद :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावर मौजा जटामखोरा येथे दिनांक 25/01/2020 चे 16.30 वा. दरम्यान पांडुरंग शालिकराम डाखोळे, वय 58 वर्ष, रा. जटामखोरा यांनी घरगुती कारणातुन विषारी औषध प्राशन केले. त्यांची प्रकृती खराब झाल्याने उपचाराकरीता प्रथम शासकीय दवाखाना केळवद व नंतर मेयो हॉस्पीटल, नागपूर येथे भरती केले असता दि. 26/01/2020 चे 19:30 वा. त्यांचा मृत्यू झाला. संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक राजेन्द्र मेश्राम, मेयो पोलिस बुथ, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार सुभाष राठोड 9823074742 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापा :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावर मौजा चारगाव येथे दिनांक 28/01/2020 चे 15.30 वा. दरम्यान सुधाकर जंगलुजी नारनवरे, वय 50 वर्ष, रा. चारगाव हे घराच्या पायऱ्या चढत असतांना चक्कर येउन पाय घसरल्याने खाली पडले. त्यामुळे त्यांच्या डोक्यावर व कपाळावर मार लागल्याने त्यांना उपचाराकामी प्रथम पीएचसी बडेगाव व नंतर मेयो हॉस्पीटल नागपुर येथे नेले असता दि 29/01/2020 चे 03:45 वा. वैद्यकिय अधिकारी यांनी तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक राजेन्द्र मेश्राम, मेयो पोलिस बुथ, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सुरू आहे.

पोलीस माहिती कक्ष<br>
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर